मे. मोहनराव शिंदे सहकारी साखर कारखाना लिमिटेड, मोहननगर, कुमठे, पोस्ट- आरग, तालुका- मिरज, जिल्हा-सांगली, महाराष्ट्र यांच्या सध्याच्या प्रकल्पात साखर उत्पादन क्षमता विस्तारिकरण ४,००० टीसीडी ते ७,५०० टीसीडी, सहविद्युत प्रकल्प आधुनिकीकरण आणि विस्तारिकरण १५.० मेगावॅट ते २८.० मेगावॅट, तसेच नवीन ४५.० केएलपीडी आसवणी प्रकल्प उभारणी संदर्भात पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी बाबतचा इतिवृत्त -

---

मे. मोहनराव शिंदे सहकारी साखर कारखाना लिमिटेड, मोहननगर, कुमठे, पोस्ट- आरग, तालुका- मिरज, जिल्हा-सांगली, महाराष्ट्र यांच्या सध्याच्या प्रकल्पात साखर उत्पादन क्षमता विस्तारिकरण ४,००० टीसीडी ते ७,५०० टीसीडी, सहविद्युत प्रकल्प आधुनिकीकरण आणि विस्तारिकरण १५.० मेगावॅट ते २८.० मेगावॅट, तसेच नवीन ४५.० केएलपीडी आसवणी प्रकल्प उभारणी संदर्भात पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी गुरुवार दिनांक, ३० डिसेंबर, २०२१ रोजी सकाळी ११.३० वाजता प्रकल्प स्थानावर आयोजित करण्यात आली होती.

मा. जिल्हाधिकारी, सांगली यांनी पर्यावरणविषयक जनसुनावणी गुरुवार दिनांक, ३० डिसेंबर, २०२१ रोजी सकाळी ११.३० वाजता आयोजित करण्यास मान्यता दिल्यानंतर सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसुचना दिनांक १४-०९-२००६ व सुधारित अधिसुचना दिनांक ०१-१२-२००९ अनुसार त्यांच्या कार्यालयीन आदेश क्रं. ई ११८ , व्दारा पत्र क्रं.बीओ/जेडी/डब्लुपीसी/पीएच/बी-२११२१४-एफटीएस-०१७० दिनांक १४ डिसेंबर, २०२१ अन्वये पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती गठीत केली त्यानुसार उपस्थिती खालील प्रमाणे.

१) डॉ. अभिजीत चौधरी, भाप्रसे — अध्यक्ष
जिल्हादंडाधिकारी, सांगली.

२) श्री संजय जिरापुरे - सदस्य
प्रादेशिक अधिकारी,महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
कोल्हापूर यांचे प्रतिनिधी,

३) नवनाथ संभाजी अवताडे - आयोजक
उप प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सांगली.

श्री नवनाथ सं. अवताडे, उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, सांगली तथा आयोजक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सदरील जनसुनावणीस उपस्थित असलेले डॉ. अभिजित चौधरी, जिल्हादंडाधिकारी, सांगली तथा अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती, श्री संजय जिरापुरे, प्रतिनिधी, प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ कोल्हापूर तथा सदस्य, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती, प्रकल्प प्रवर्तकांचे अधिकारी, तांत्रिक सल्लागार, कारखान्याचे पदाधिकारी, पत्रकार, पर्यावरण क्षेत्रात कार्यरत असणा-या संस्था व उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे स्वागत केले. समितीच्या अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी बाबतची प्रस्तावना विषद केली.

आयोजक यांनी कोविड-१९ व ओमिक्रॉनच्या पार्श्वभूमीवर सदरहू जनसुनावणी आयोजित करण्यात आलेली असून सदरची सुनावणी भारत सरकारच्या वने, पर्यावरण व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४-०९-२०२० च्या Office Memorandum नुसार कोविडच्या पार्श्वभूमीवर पर्यावरणविषयक जनसुनावणी आयोजित करण्यासाठी काही निर्देश पारित करण्यात आले आहेत. त्यानुसार प्रत्येक व्यक्तिचे शारीरीक तापमान तपासणे व सॅनिटायझरचा वापर बैठकीच्या प्रवेशव्दारावर करण्यात आलेला असून बैठकीच्या स्थानावर प्रत्येक व्यक्तीने मुखपट्टी (मास्क) घालणे व दोन व्यक्तींमध्ये सामाजिक अंतर ठेवणे बंधनकारक असल्याने ते निर्देश पाळण्याची सूचना केली.

आयोजक यांनी असेही सांगितले की भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व सुधारित दिनांक १ डिसेंबर,

२००९ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरणविषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

आयोजक यांनी असे सांगितले की महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास प्रकल्प प्रवर्तक मे. मोहनराव शिंदे सहकारी साखर कारखाना लिमिटेड, मोहननगर, कुमठे, पोस्ट-आरग, तालुका- मिरज, जिल्हा-सांगली, महाराष्ट्र यांच्या सध्याच्या प्रकल्पात साखर उत्पादन क्षमता विस्तारिकरण ४,००० टीसीडी ते ७,५०० टीसीडी, सहविद्युत प्रकल्प आधुनिकीकरण आणि विस्तारिकरण १५.० मेगावॅट ते २८.० मेगावॅट, तसेच नवीन ४५.० केएलपीडी आसवणी प्रकल्प उभारणी संदर्भात पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्यासाठी अर्ज प्राप्त झाला. सदर प्रकल्पास "पर्यावरण अनुमती" प्राप्त करणे व त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी घेणे बंधनकारक आहे.

आयोजक यांनी असे स्पष्टीकरण दिले की पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीचा मूळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पात बंधनकारक असणा-या प्रदूषण नियंत्रण संयत्रणेची माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सूचनेचा विचार करणे असा आहे.

प्रकल्प प्रवर्तकांनी भारत सरकारच्या पर्यावरण, वने व जलवायू परिवर्तन मंत्रालयातील आघात मुल्यांकन विभागास प्राथमिक मान्यता (ToR) प्रदान करण्यासाठी व पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करण्यासाठी ऑनलाईन अर्ज केला व त्यास अर्जास भारत सरकारने ऑनलाईन मंजूरी दिनांक २९-११-२०१८ रोजी प्रदान केली.

वरिल पर्यावरण अधिसुचनेनुसार तीस दिवस अगोदर स्थानिक वृत्तपत्रात पर्यावरण विषयक जाहीर जनसूनावणी सूचना देणे बंधनकारक आहे. त्याअनुषंगाने उप प्रादेशिक कार्यालय , म.प्र.नि. मंडळ, सांगली यांनी स्थानिक दैनिक वृत्तपत्र सकाळ यात मराठीत व

राष्ट्रीय वृत्तपत्र द टाइम्स ऑफ इंडिया यात इंग्रजीत दिनांक ३० नोव्हेंबर, २०२१ रोजी जाहिर सुनावणी सूचना दिलेली होती. त्यात सामान्य जनतेस उपरोक्त प्रकल्पाविषयी काही आक्षेप, हरकती, सूचना असल्यास त्या सुनावणी अगोदर वा सुनावणीवेळी लेखी/तोंडी नोंदविण्याचे आवाहन करण्यात आले होते.

त्याप्रमाणे नियोजित प्रकल्पाविषयीचा दस्तावेज म्हणजे पर्यावरण मुल्यांकन आघाताची व कार्यकारी सारांश अहवालाची इंग्रजी व मराठी प्रत जनतेच्या माहितीसाठी व अवलोकनार्थ शासनाच्या अधिसूचित कार्यालयांमध्ये म्हणजे भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, विभागीय कार्यालय, पश्चिम-मध्य विभाग, न्यू, सेक्रेटरिएट बिल्डिंग, तळमजला, ईस्ट विंग, सिव्हिल लाईन, नागपूर-४४० ००१, मा. जिल्हाधिकारी कार्यालय-सांगली, मुख्य कार्यकारी अधिकारी - जिल्हा परिषद, सांगली, महाव्यवस्थापक-जिल्हा उद्योग केंद्र, सांगली , तहसीलदार, तहसील कार्यालय-मिरज, जिल्हा-सांगली, ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय- बेडग, आरग, एरंडोली, लिंगनूर, लांडगेवाडी, पाय्यपाचीवाडी, तालुका-मिरज, जिल्हा-सांगली, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन, नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालय, मुंबई, मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई, प्रादेशिक कार्यालय,महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ - कोल्हापूर, उप प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सांगली व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या www.mpcb.gov.in या संकेत स्थळावर जनतेच्या माहिती व आभ्यासासाठ व उपलब्ध करुन देण्यांत आलेले होते.

आयोजक यांनी उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे काही आक्षेप,हरकती, सूचना असल्यास ती संधि देण्यात आलेली असून ते लेखी वा तोंडी स्वरुपात ती देऊ शकतात असे सांगितले.

आयोजक यांनी पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणीचे पुढील कामकाज सुरु करण्याची परवानगी मा. अध्यक्षांना केली.

मा. अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार यांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी संपूर्ण पर्यावरण व्यवस्थापन योजनेबाबत सादरीकरण केले. त्यांनी प्रस्तावित प्रकल्पाचे भौगोलिक स्थान, प्रस्तावित प्रकल्पामुळे पर्यावरणावरील संभाव्य आघात, त्यासाठी तयार करण्यात आलेल्या पर्यावरण व्यवस्थापन योजना याबाबत माहिती दिली. त्यांनी सांगितले की सदरहू प्रकल्प हा कृषि आधारित उद्योग असून प्रकल्प हा शून्य द्रव निःस्सारण म्हणजे Zero Liquid Discharge प्रकल्प आहे. प्रकल्पातून प्रकल्पाबाहेर प्रक्रियायुक्त सांडपाण्याचा एकही थेंब प्रकल्पाबाहेर जाणार नाही. त्याचप्रमाणे वायू प्रदूषण नियंत्रणासाठी अत्याधुनिक असे ईएसपी (इलेक्ट्रो स्टॅटिक प्रेसिपरेटर) ही सयंत्रणा चिमणीमध्ये (Stack) कार्यान्वित करण्यात येणार आहे. प्रकल्पामुळे ध्वनि प्रदूषण होणार नाही. त्याचप्रमाणे आधुनिक तंत्रज्ञान प्रकल्पात कार्यान्वित करणार असल्याने वासाचा त्रास होणार नाही.

प्रकल्प पर्यावरण व्यवस्थापनासाठी भांडवली खर्च ४.७३ कोटी, तर पुनरावर्ती खर्च ९३.० लाख रुपये एवढा होईल. प्रकल्प हा ब्राऊन फिल्ड असल्याने एकूण प्रकल्पाच्या १% म्हणजे ४.०४ कोटी एवढी रक्कम ही कॉर्पोरेट पर्यावरण जबाबदारी (Corporate Environment Responsibility) उपक्रमासाठी खर्च करण्यात येईल. प्रकल्प विस्तारिकरण व नवीन आसवणी उभारणीसाठी अतिरिक्त ११७ मनुष्यबळाची गरज असून एकूण ५६७ व्यक्ती प्रकल्पात कार्यान्वित राहतील.

प्रकल्पाचे सादरीकरण पूर्ण झाल्यानंतर आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना सांगितले की पर्यावरण सल्लागार यांनी जल, वायू, ध्वनि, घातक व अघातक कचरा व त्यावरील उपाय योजना, पर्यावरण उपक्रम याबाबत सखोल व सविस्तर सादरीकरण केलेले आहे. तरी उपरोक्त प्रकल्पाविषयी उपस्थितांच्या पर्यावरणीय सूचना, आक्षेप, टीकाटिप्पणी असल्यास त्या उपस्थित करण्याचे आवाहन केले. सूचना, आक्षेप नोंदविताना आपले संपूर्ण नाव व गाव सांगण्यात यावे जेणेकरुन सदर बाबतची नोंद इतिवृत्तांमध्ये घेवून पुढे ते शासनाकडे सादर करणे सोईचे होईल असे सांगीतले.

खालील उपस्थित व्यक्तींनी चर्चेत सहभाग घेतला व त्यांना प्रकल्प सल्लागार / प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी स्पष्टिकरण दिले.

१. श्री संताजी रामचंद्र गायकवाड, राहणार- मुक्काम पोस्ट- बेळंकी, तालुका-मिरज, जिल्हा-सांगली.

प्रश्न- सदरहू प्रकल्प विस्तारिकरणामुळे व नवीन आसवणी प्रकल्पामुळे प्रदूषण होणार का व ते कितपत होईल?

उत्तर- प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की सादरीकरणात सांगितल्याप्रमाणे सदरहू प्रस्तावित प्रकल्प हा झिरो लिक्विड डिस्चार्ज म्हणजे शून्य द्रव निःस्सारण प्रकल्प असेल. प्रकल्पातून प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याचा एकही थेंब प्रकल्पाबाहेर जाणार नाही. त्यामुळे परिसरात पाण्याचे प्रदूषण होणार नाही. पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की वायूप्रदूषण नियंत्रणासाठी अत्याधुनिक अशी ईएसपी (इलेक्ट्रो-स्टॅटिक प्रेसिपरेटर) ही हवा प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा कार्यान्वित करण्यात येणार आहे. ती ९९.९९% कार्यक्षम असते. त्यामुळे संपूर्ण धुलीकण हे अडकतील त्यामुळे सदर प्रकल्पामुळे वायू प्रदूषण होणार नाही.

२) श्री बाळासाहेब कृष्णराव पाटील, राहणार-मुक्काम पोस्ट - एरंडोली, तालुका-मिरज, जिल्हा-सांगली.

प्रश्न- सदरहू प्रकल्पामुळे शेतक-यांच्या पाण्याचे काही नुकसान होईल काय?

उत्तर- पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की शेतक-यांच्या पाण्याचे कोणत्याही प्रकारचे नुकसान होणार नाही. सादरीकरणात सांगितल्याप्रमाणे सदरहू प्रकल्प हा झिरो लिक्विड डिस्चार्ज म्हणजे शून्य द्रव निःस्सारण प्रकल्प असेल. प्रकल्पातून प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याचा एकही थेंब प्रकल्पाबाहेर जाणार नाही. प्रकल्पात अत्याधुनिक अशी आर.ओ.(Reverse Osmosis) सयंत्रणा कार्यानव्त करण्यात येणार आहे. त्यामुळे प्रकल्पातील प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याचा उत्पादनात पुनर्वापर करण्यात येणार आहे. परिसरात पाण्याचे प्रदूषण होणार नाही. त्यामुळे शेतक-यांच्या पाण्याचे कोणत्याही प्रकारचे नुकसान होणार नाही.

३) श्री तानाजी राजाराम दळवी, राहणार-मुक्काम पोस्ट - व्यंकोचीवाडी, तालुका-मिरज, जिल्हा-सांगली.

प्रश्न- सदरहू प्रकल्प विस्तारिकरण व नवीन आसवणी प्रकल्प विकसित करताना काही वृक्षतोड होणार आहे काय?

उत्तर- प्रकल्पाच्या पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की कोणत्याही प्रकारची वृक्षतोड होणार नाही. सादरीकरणात प्रकल्पाचा आराखडा दाखविला, त्यात आता छोटी खुरटी झुडपे आहेत. त्यास वृक्ष म्हणता येत नाही. ती अत्यल्प प्रमाणात काढावी लागतील. कोणत्याही प्रकारची वृक्षतोड होणार नाही.

४) **श्री तानाजी दळवी यांनी पुढील प्रश्न विचारला की हवा प्रदूषणाबाबत स्पष्टीकरण परत देण्यात यावे.**

प्रश्न- पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की नवीन प्रकल्पात ११०.० टीपीएचचा बॉयलर असेल. त्याला चिमणी ही ६२ मीटर उंचीची असेल. तेथे ईएसपी कार्यान्वित करण्यात येणार आहे. त्यात ९९.९९% धुलीकण हे अडकतील. कुठल्याही प्रकारे धुलीकण बाहेर जाण्याची शक्यता नाही. त्याचप्रमाणे कुठल्याही प्रकारचा वायूचे उत्सर्जन/बाहेर जाणार नाही.

५) **श्री अविनाश रावसाहेब केरीमाने, राहणार-मुक्काम पोस्ट- मालगांव, तालुका-मिरज, जिल्हा-सांगली.**

प्रश्न- सदरहू प्रकल्प विस्तारिकरणामुळे किती लोकांना रोजगार उपलब्ध होईल?

उत्तर- नवीन प्रकल्पात ११७ नवीन लोकांना रोजगाराची संधि मिळू शकेल. कार्यान्वित जुना व नवीन प्रकल्प हे दोन्ही मिळून एकूण ५६७ लोकांना रोजगाराची संधि मिळेल.

६) **श्री बाबासाहेब भाऊसाहेब नरगच्चे, राहणार- मुक्काम पोस्ट - बोलवाड, तालुका-मिरज, जिल्हा-सांगली.**

प्रश्न- मी शेतकरी आहे. प्रकल्पात उत्पन्न होणारी वीज व खत हे स्थानिक शेतक-यांना उपलब्ध होईल काय?

उत्तर- प्रकल्पाचे कार्यकारी संचालक यांनी सांगितले की प्रकल्पात उत्पन्न होणारी वीज नियमाप्रमाणे कराराप्रमाणे महाराष्ट्र शासनाच्या महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड या वीज उत्पादन कंपनीस विकली जाणार आहे. त्यामुळे आसपासच्या गावांना त्यांची जशी वितरिका असेल, त्याप्रमाणे महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी वीज उपलब्ध करणार आहे. त्याचप्रमाणे प्रकल्पात उत्पन्न होणारे खत हे उत्कृष्ट प्रतीचे असून ते सभासदांना व लाभार्थींना उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

७) **श्री शिवाजी श्रीकांत महाडिक, मुक्काम पोस्ट-शिपुर, तालुका-मिरज, जिल्हा-सांगली.**

प्रश्न- सदरहू प्रकल्प विस्तारिकरण व नवीन आसवणी प्रकल्प स्थापनेमुळे शेतक-यांचा काय फायदा होणार आहे? कशा पध्दतीने फायदा होणार आहे?

उत्तर- प्रकल्पाच्या कार्यकारी संचालक यांनी सांगितले की या प्रकल्पात अत्यंत आधुनिक सयंत्रणा कार्यान्वित करण्यात येणार असल्याने कुठल्याही प्रकारचे प्रदूषण होणार नाही. त्यामुळे जल, वायू व ध्वनि प्रदूषण होणार नाही. ऊस गाळप क्षमता विस्तारिकरणामुळे परिसरातील सर्व शेतक-यांच्या ऊस जास्त प्रमाणात खरेदी करुन त्याचे गाळप करण्यात येईल. ऊस उशीरा खरेदी केल्याने जी वजनात घट होते, ती होणार नाही. ऊस गाळप वेळेत झाल्याने कारखान्याचा साखर उतारा थोड्या प्रमाणात वाढणार आहे. त्यामुळे कारखान्याचे उत्पन्नही वाढेल. शिवाय इथेनॉल प्रकल्पामुळे अतिरिक्त उत्पन्न कारखान्यास मिळेल. बँकेला भांडवली उत्पन्नासाठी जादा व्याज देणे कमी होईल. त्यामुळे स्थानिक शेतक-यांच्या ऊसाला जादा भाव देणे कारखान्यास शक्य होणार आहे.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना आणखी कोणाच्या सदरहू प्रकल्पाविषयी काही सूचना, आक्षेप असल्यास त्या नोंदविण्याचे आवाहन केले.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी बैठकीत सांगितले की पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचनेतील तरतुदींनुसार उप प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सांगली यांना जनसुनावणी बैठकीच्या तीस दिवस अगोदर स्थानिक व राष्ट्रीय वृत्तपत्रात जनसुनावणीबाबत जाहिर सूचना प्रकाशित केलेली होती. त्याचप्रमाणे अधिसूचित शासकीय कार्यालयात पर्यावरणविषयक दस्तावेज उपलब्ध करुन देण्यात आलेला होता. त्याअनुषंगाने ग्रामपंचायत कार्यालय, आरग यांनी ग्रामविकास अधिकारी श्री एन.बी कोरे, ग्रामपंचायत आरग यांचेमार्फत सदरहू प्रकल्पाबाबत आणि जनसुनावणीबाबत स्थानिक जनतेकडून प्राप्त झालेल्या सूचना, आक्षेप उप प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि.मंडळ, सांगली यांना सादर केलेले आहेत. त्यामध्ये १६६ जणांची नांवे आहेत. त्याचप्रमाणे वैयक्तिक स्तरावरही काही निवेदने उप प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि.मंडळ, सांगली यांना प्राप्त झालेली आहेत. तरी त्या सर्व लेखी सूचना, आक्षेपास प्रकल्प प्रवर्तक व त्यांचे पर्यावरण सल्लागार यांनी लेखी स्वरुपातील स्पष्टीकरण उप प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि.मंडळ, सांगली यांना सादर करावे अशी सूचना केली.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी बैठकीत सांगितले की इतर अधिसूचित शासकीय कार्यालयाकडून कुठलेही आक्षेप, सूचना, टीकाटिप्पणी आजपावेतो प्राप्त झालेल्या नाहीत. तरी बैठकीत उपस्थितांना त्यांच्या सूचना, आक्षेप लेखी स्वरुपात सादर करायचे असल्यास त्या देऊ शकतात. त्याची पोहच देण्यात येईल. प्राप्त झालेल्या सर्व लेखी सूचना, आक्षेप, प्रकल्प प्रवर्तकांनी आक्षेपांना दिलेले स्पष्टीकरण, त्याचप्रमाणे प्रकल्पास पाठिंबा असलेली पत्रे ही बैठकीच्या इतिवृतांमध्ये नमूद करुन अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालासोबत शासनास सादर करण्यात येईल.

आयोजकांनी परत उपस्थितांना आणखी कोणाच्या कांही सूचना, आक्षेप असल्यास त्या नोदविण्याचे आवाहन केले. उपस्थितांकडून कोणताच प्रतिसाद नसल्याचे निदर्शनास आल्याने आयोजक यांनी मा. अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांना मनोगत व्यक्त करण्याची विनंती केली.

मा. अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की आज आपण मोहनराव शिंदे सहकारी साखर कारखाना लिमिटेड, मोहननगर, आरग, तालुका-मिरज, जिल्हा-सांगली यांच्या प्रकल्प विस्तारिकरण आणि नवीन ४५.० केएलपीडी आसवणी प्रकल्प उभारणीच्या जनसुनावणीसाठी जमलेलो आहोत. भारत सरकारच्या पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचनेनुसार पर्यावरणविषयक जनसुनावणी घेणे बंधनकाकरक असल्याने, त्या निर्देशांनुसार स्थानिक व राष्ट्रीय वृत्तपत्रात जाहिर सूचना देण्यात आली, त्याचप्रमाणे पर्यावरणविषयक दस्तावेज हा अधिसूचित शासकीय कार्यालयात उपलब्ध करण्यात आलेला होता. पर्यावरण सल्लागार यांनी सादरीकरणात प्रकल्पाबाबत संपूर्ण माहिती दिलेली आहे. उपस्थितांच्या प्रश्नांना पर्यावरण सल्लागार व कारखाना व्यवस्थापन यांनी योग्य प्रकारे उत्तरे दिलेली आहेत. बैठकीत आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितलेले आहे की बैठकीत उपस्थित सर्व तोंडी सूचना, आक्षेप, यांची नोंद बैठकीच्या

इतिवृत्तामध्ये घेण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे लेखी आक्षेपांना पर्यावरण सल्लागार यांनी दिलेले लेखी स्पष्टीकरण इतिवृतान्तासोबत शासनास सादर करण्यात येणार आहे. अध्यक्ष यांनी मत मांडले की अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात ही जनसुनावणी पार पडलेली आहे. कोविडच्या पार्श्वभूमीवर जनसुनावणी बैठकीची व्यवस्था योग्य प्रमाणात करण्यात आलेली आहे. त्यांनी उपस्थितांना काही लेखी सूचना, आक्षेप सादर करण्याबाबत आवाहन केले. उपस्थितांकडून कोणताच प्रतिसाद नसल्याने मा. अध्यक्षांनी जनसुनावणी संपन्न झाल्याचे घोषित केले.

शेवटी आयोजक पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी यांनी समितीचे मा. अध्यक्ष, सदस्य तसेच सर्व उपस्थित नागरीक, विविध माध्यमांचे प्रतिनिधी, कारखान्यांचे पदाधिकारी, तात्रिक सल्लागार व प्रकल्प प्रवर्तक यांनी केलेल्या सहकार्याबददल आभार मानुन मा. अध्यक्षांच्या परवानगीने आजची पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी संपन्न झाल्याचे जाहीर केले.

उपरोक्त सुनावणीची कार्यवाही सकाळी ११-३० वाजता सुरु होवून दुपारी ०१-१५ वाजता समाप्त झाली.

सदर प्रकल्पाच्या पर्यावरण विषयक जनसुनावणी संदर्भात दिनांक २९-१२-२०२१ परिसरातील २८२ नागरीकांच्या लेखी आक्षेप/सूचना तसेच ग्रामपंचायत कार्यालय, आरग यांचेकडील जा.प.क्रं. २४०/२१ दिनांक २९-१२-२०२१ रोजीच्या पत्रान्वये दिनांक ३०-१२-२०२१ रोजी १६६ नागरीकांच्या लेखी स्वरुपाच्या आक्षेप/सूचना या कार्यालयाकडे प्राप्त झालेल्या आहेत. त्या आक्षेप/सूचनांची तपशिलवार माहिती व सदरील आक्षेप/सूचना बाबतचे कारखाना/कारखान्यांचे तांत्रिक सल्लागार यांचेकडून प्राप्त झालेले लेखी उत्तर/स्पष्टीकरण सोबतच्या तक्त्यामध्ये जोडण्यात आले आहे. त्याचप्रमाणे सर्व लेखी स्वरुपात प्राप्त झालेल्या आक्षेप/सूचनांच्या तसेच कारखाना/कारखान्यांचे तांत्रिक सल्लागार यांचेकडून सदर

आक्षेप/सूचनास अनुसरुन प्राप्त झालेले उत्तर/स्पष्टीकरणाच्या छायांकित प्रतीही सोबत जोडल्या आहेत.

(नवनाथ अवताडे)
आयोजक तथा
उप प्रादेशिक अधिकारी,म. प्र. नि.मंडळ
सांगली.

(श्री संजय जिरापुरे)
सदस्य तथा
प्रतिनिधी प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ
कोल्हापूर.

(डॉ. अभिजीत चौधरी,भाप्रसे)
अध्यक्ष,
जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी,
सांगली.